# ग्रामीण रुग्णालय मंडणगड, ता. मंडणगड

## राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम

जा.क्र.ग्रा.रु.मं./आस्था/एनएचएम/155/२०२६ दिनांक:-१५/०६/२०२६

---

### वाहन भाडेतत्वावर घेणेसाठी दरपत्रक

राष्ट्रीय आरोग्य अभियान राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत ग्रामीण रुग्णालय मंडणगड आस्थापनेवरील आरबीएसके वैद्यकिय पथकांना ० ते १८ वयोगटातील अंगणवाडी व शाळा स्तरावरील मुलांची आरोग्य तपासणी करीता वाहन भाडेपध्दतीने घेणेसाठी वाहन मक्तेदाराकडून २ सिलबंद लखोटयामध्ये दरपत्रके मागविणेत येत आहेत. **लखोटा क्र.१ मध्ये खाली नमूद केलेली अटी-शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रे व लखोटा क्र.२ मध्ये फक्त दरपत्रक इ. सिलबंद स्वरुपात कार्यालयामध्ये जमा करावेत.**

### दरपत्रकाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे –

१) दरपत्रक विहीत नमुन्यात व मुदतीत या कार्यालयाकडे पोहचविणे आवश्यक आहे.

२) उशिरा प्राप्त झालेले दरपत्रक स्वीकारले जाणार नाही.

३) सिलबंद लखोटयावर राष्ट्रीय आरोग्य अभियान राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम ग्रामीण/उपजिल्हा स्तरावरील आरबीएसके वैद्यकिय पथकांसाठी वाहन भाडेतत्वावर पुरविण्यासाठी दरपत्रक असा उल्लेख करावा.

४) वाहनाचे इंधन, वंगण दुरुस्ती व वाहनचालकाचा खर्च (वेतन भत्ते, प्रवास भत्ते) इ. सह दरपत्रक सादर करावे.

५) सदर वाहन हजर तारखेपासून ३१ मार्च २०२७ किंवा राज्यस्तरावरुन वाहनांची प्रक्रिया पुर्ण होईपर्यत ग्राहय राहील.

६) वाहनसेवा ही २४ X ७ कालावधीसाठी वाहनचालकासह वैद्यकिय पथकासाठी उपलब्ध असावी. त्यासाठी चालकाला कुठलाही अतिरिक्त भत्ता दिला जाणार नाही.

७) वाहनाची मर्यादित धाव ० ते १५०० कि.मी. प्रतिमहा या मर्यादेत निश्चित करणेत आली आहे.

८) शासकिय वापराकरीता वाहनाची दरमहा धाव १५०० कि.मी. चे अधीन राहून देयक अदा करणेत येईल. वाहनाचे धाव १५०० कि.मी. पेक्षा कमी झाल्यास १५०० कि.मी. चे देयक अदा करणेत येईल.

९) **वाहनधारकाचे वाहन मंजुरीनंतर कार्यारंभ आदेशाच्या ३ टक्के रक्कम अनामत रक्कम म्हणून ग्रामीण /उपजिल्हा रुग्णालय स्तरावरील वैद्यकिय अधिक्षक यांचे खातेवर भरणा करणे बंधनकारक राहील. तसेच रु.१००/- चे करारपत्रकावर लिहून देणे बंधनकारक असेल.**

१०) आरबीएसके अंतर्गत तात्पुरत्या स्वरुपात घेण्यात येणारी सर्व **T-Permit** वाहने ही फक्त आरबीएसके कार्यक्रमासाठीच वापरण्यात यावीत. ही सर्व वाहने ४+१ सीट असलेली बंद बॉडी या तत्सम स्वरुपातील व इंजिन कॅपॅसिटी १००० सीसी च्या वर असणे आवश्यक आहे. सर्व वाहने मागील ८ वर्षे कालावधीपेक्षा जुनी नसणे बंधनकारक राहील. **आरबीएसके कार्यक्रमासाठी वापरण्यात येणारे वाहन हे नोंदणीकृत T-Permit असणे आवश्यक आहे.** RTO कडील सर्व परवाने व गाडिचा पुर्ण विमा भरलेला असणे आवश्यक आहे.

११) वाहनाचा वापर डोंगराळ व अतिदुर्गम भागात केला जाईल.

१२) किरकोळ अथवा कोणत्याही स्वरुपाची दुरुस्ती व देखभाल करणे हे ही वाहनधारकाची जबाबदारी राहील.

१३) कराराच्या दरम्यानच्या काळात वाहनांच्या भागांची टायर, लूब्रीकंट्स, डिझेल आदीच्या किमतीत वाढ झाल्यास कुठल्याही प्रकारे दर वाढविले जाणार नाही / तशी मागणी करता येणार नाही. याबाबत अंतिम निर्णय जिल्हा शल्यचिकित्सक यांचे राहतील.

१४) आरबीएसके अंतर्गत वाहनांची राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाव्यतिरिक्त इतर रुग्णालयीन तसेच इतर खाजगी कामासाठी गैरवापर झाल्याचे निदर्शनास आल्यास योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

१५) दिलेल्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे वाहन उपलब्ध झाल्यास सदर वाहन सेवा अभियंता, जिल्हा कार्यशाळा

रत्नागिरी यांचेकडून तपासणी करुन घेण्यात यावीत.

१५) सेवा अभियंता जिल्हा कार्यशाळा रत्नागिरी यांचेकडून वाहन योग्य असलेबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर वाहन रुजु करुन घेण्यासाठी आपल्या स्तरावरुन आदेश देण्यात यावेत.

१६) वाहन रुजु करुन घेतल्यानंतर वाहनाची सर्व कागदपत्रे (आरसी, इंन्स्युरन्स, पीयुसी, टॅक्स भरणा पावती, फिटनेस इ..), वाहन हजर झालेचा हजर अहवाल व सेवा अभियंता यांचेकडील प्राप्त अहवाल या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

१७) वाहनचालकाचे वाहन चालविण्याचे ड्रायव्हिंग लायसन्स असणे बंधनकारक राहील.

१८) ज्या कालावधीत वाहन उपलब्ध नसेल त्या कालावधीमध्ये दुस-या वाहनाची व वाहनचालकाची पर्यायी व्यवस्था करणे बंधनकारक राहील. ती न केल्यास पर्यायी व्यवस्थेसाठी जो खर्च केला जाईल तो देयकातून अथवा सुरक्षा अनामतीमधून वसूल करण्यात येईल. कोणत्याही कारणामुळे वाहन उपलब्ध करुन न दिल्यास पहिला १ तास वगळता पुढील प्रत्येक तासासाठी किंवा तासाच्या भागासाठी रु.५०/- (र. रु.पन्नास मात्र) इतकी देयक रकमेतून वजा केली जाईल अथवा वसूली केली जाईल. याबाबत सर्व अधिकार वैद्यकिय अधिक्षक ग्रामीण /उपजिल्हा रुग्णालय सर्व यांचे राहतील.

१९) देयक सादर करताना लॉगबुक पडताळणी करीता सादर करावे. वाहन फिरती केलेल्या वाहनाचे लॉगबुक आरबीएसके वैद्यकिय अधिकारी व वैद्यकिय अधिक्षक यांच्या सहीने प्रमाणित करुन त्याचे देयक आपल्या स्तरावरुन अदा करण्यात यावे. लॉगबुक सादर न केल्यास देयके पारित करता येणार नाही. परिपूर्ण लॉगबुक सादर करण्याची जबाबदारी वाहनधारकाची राहील.

२०) तसेच लॉगबुक झेरॉक्स प्रतिमहा या कार्यालयास सादर करण्याची जबाबदारी आरबीएसके वैद्यकिय अधिकारी यांची राहील.

२१) कोणतेही कारण न देता वाहनासाठी केलेला करार केव्हाही संपुष्टात आणण्याचा अधिकार वैद्यकिय अधिक्षक यांनी राखून ठेवलेला आहे.

| अ.क्र. | वाहनाचा सविस्तर तपशील | दरमहा किलोमीटर मर्यादा | प्रतिवाहन, प्रतिमहा प्रतिपथक भाडे दर |
|---|---|---|---|
| १ | सेडन - इंडिगो, स्विफट डिझायर, होंडा अमेझ (४+१ आसनक्षमता) T-Permit इंजिन कॅपॅसिटी १००० सीसी | ० ते १५०० की.मी. | रक्कम रु. ३१,२३८/- (जीएसटी सह) |

दरपत्रके सीलबंद लखोटयात दिनांक २२/०६/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ग्रामीण रुग्णालय मंडणगड येथे (सुट्टीचे दिवस वगळुन) वैद्यकिय अधिक्षक यांचे कार्यालयीन टपालात आणून द्यावयाचे आहेत.

सही /-

MEDICAL SUPERINTENDENT
Rural Hospital Mandangad

वैद्यकिय अधिक्षक,
ग्रामीण रुग्णालय मंडणगड

टिप :- तालुका लेखापाल एनएचएम तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय यांचेशी संपर्क साधून खालील website वरती दरपत्रक जाहिरात प्रसारित करण्यात येत आहे.

**itnrhmmum@gmail.com,**
**it.nhm_mh@nic.in**